ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - IX Issue - II March - August - 2021

Marathi Part - III / Hindi

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चलन विषयक व आर्थिक विचार<br>**डॉ. एम. व्ही. हिरे** | ६३-६६ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही संदर्भातील विचार<br>**सहा. प्राध्यापक एस. एस. तायडे** | ६७-७१ |
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक सुधारणा<br>**प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद ढबाळे** | ७२-७७ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार<br>**प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे** | ७८-८४ |
| १६ | महिला सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन<br>**प्रा. डॉ. निता सोमनाथे (गभने)** | ८५-९० |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता<br>**डॉ. के. जी. वाकोडे** | ९१-९४ |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जाती निर्मुलन विषयक विचार<br>**प्रा. तळणीकर एस. जी.** | ९५-९८ |
| १९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता<br>**प्रा. सुलक्षणा हरी कोळी** | ९९-१०३ |
| २० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबंधी विचार : एक चिकित्सक अध्ययन<br>**डॉ. सुभाष दौलतराव उपाते** | १०४-१११ |

# १४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक सुधारणा

प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद उबाळे
समाजशास्त्र विभाग, संत भगवान बाबा कला, महाविद्यालय, सिंदखेड राजा जि. बुलडाणा.

**प्रस्तावना**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ भारतीय समाजव्यवस्थे मधील चातुवर्ण्य व्यवस्थेतील सर्वात कनिष्ट, हिन आणि अधिकार विहिन जाती व्यवस्थेत झाला होता. त्यामुळे जातीयता, दारिद्रय, तिरस्कार, अवहेलना याचे चटके अगदी बालपणापासूनच बाबासाहेबांनी अनुभवले होते. या व्यवस्थेने बहुसंख्य लोकांचे जिवन ग्रासले होते. या परिस्थितीत बदल झाल्याशिवाय समाजामध्ये प्रगती होणार नाही याची जाणीव त्यांना होती. पराकाष्ठेची जिद्द आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर सर्व प्रतिकुल परिस्थितीवर मात करत त्यांनी अखंड ज्ञानसाधना केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई मधील "एलफिस्टन हायस्कूल" मधून १९१५ मध्ये एम.ए. (अर्थशास्त्र), अमेरिकेतील "कोलंबिया" या नावाजलेल्या विद्यापिठातून एम.ए. व १९१७ साली Ph. D. केली. त्यांनतर १९२३ साली इंग्लडमधील "लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स" या विश्वविख्यात शिक्षणसंस्थेतून डॉक्टर ऑफ सायन्य आणि लंडनच्या "ग्रेज इन" विद्यापिठामधून बॅरिस्टरची पदवी अशा सर्वोच्च पदव्या प्राप्त केल्या. या शिवाय त्यांनी जगातील १) अर्थशास्त्र २) राज्यशास्त्र ३) समाजशास्त्र ४) मानवशास्त्र ५) धर्मशास्त्र ६) नितिशास्त्र ७) शिक्षणशास्त्र ८) इतिहास ९) कायदा या सामाजिक शास्त्रांचा देखील सखोल अभ्यास केला.

सामाजिक शास्त्राच्या अभ्यासा बरोबरच त्यांनी जगातील १) युध्द २) परकियांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्या आणि ३) विविध देशातील क्रांत्यांचा सखोल अभ्यास केला. ४) वंशवादाचा आणि जागतिक स्तरावर असलेल्या गुलामांच्या जिवनाचा ही अभ्यास केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाचनात, चिंतनात व लेखनात प्रचंड ताकद व शक्ती होती. ज्ञान संपन्नतेच्या शक्ती मुळेच व्यक्ती, समाज, राज्य आणि राष्ट्र महान बनत असते. याची त्यांना पुरेपुर जाणिव होती. भारतातील ब्रिटीश साम्राज्याच्या शेवटच्या कालखंडात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थक आणि राजकीय परिवर्तन घडवून आणण्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर अग्रेसर होते. भातीय राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून आणि इतर अनेक क्षेत्रातील विविधलक्ष्यी कामगीरीतून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक भारताच्या पायाभरणीसाठी आपले सर्वस्व वाहून घेतले होते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्वावर आधारीत जातिविरहित, वर्गविरहित आणि लोकशाही प्रणीत नवसमाजाची निर्मिती हा त्यांचा ध्यास होता. आणि तोच त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा मुलाधार होता. कोट्यावधी पदलितांचे ते तारणहार होते. उध्दारक होते, यात शंकाच नाही. ते व्यापक मानवी हक्काचे कैवारी होते. म्हणूनच आधुनिक भारताच्या सामाजिक सद्सद्विवेक बुध्दीचा मानदंड म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



284

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जिवनाचा धगधगता यज्ञकुंड शेवटपर्यंत सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक सुधारणेसाठी, देशाच्या उज्वल भविष्यासाठी तेवत ठेवला. आयुष्यभर ते सकल मानव कल्याणासाठी झिजले. त्यांनी अनेक सामाजिक सुधारणा केल्या. त्यांचा आढावा घेणे म्हणजेच हिमालयाला गवसनी घालण्याचा प्रकार आहे. समुद्राची खोली मोजण्याचा व आकाशाची उंची मोजण्यासारखा प्रकार आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या काही सामाजिक सुधारणा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या तळागळातील सर्वसामान्य माणुस त्याच्या सर्वशक्तीनिशी जागा केला. त्याला आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता व सामर्थ्याची जाणीव करुन दिली. माणसिक गुलामगीरीतून मुक्त केले. हक्काने आणि अधिकाराने जगण्याचे शिकविले. त्यासाठी प्रसंगी संघर्ष व सत्याग्रह करुन समता व न्याय समाजात निर्माण केला.

**१. सामाजिक सुधारणा (परिवर्तन)**

भारतीय समाजव्यवस्था जातीभेदावर उभी असून ती सर्वांना सामाजिक दृष्ट्या समान वागणुक देत नाही. वर्षनुवर्षे ती अमानवी व असहिष्णु ही राहीली आहे. म्हणून ती बदलली पाहिजे ही डॉ. आंबेडकरांची मनोभावना होती. देशातील प्रत्येक माणसाला सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्क आहेत, ते त्यांना जन्माच्या किंवा परंपरेच्या कुठल्याही कारणामुळे नाकारले जाता कामा नये अशी त्यांची धारणा होती.

**२. अन्याया विरुध्द लढण्याची जाणीव**

भारतीय समाज व्यवस्था समतेच्या व न्यायाच्या तत्वावर उभी राहिली पाहिजे. त्यासाठी अन्याय, अत्याचार मुकाटपणे सहन करणाऱ्यांची अस्मितां जागृत करणे आणि अन्याय करणाऱ्या तथाकथितं, परंपरावादी स्पृश्य हिंदु समाजाला ते करत असलेल्या अन्यायाची जाणीव करुन देणे, या दोन बाबी नजरे समोर ठेवून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक हक्काचा लढा उभारला.

**३. अस्पृश्यता निवारण**

अस्पृश्यांच्या वाट्याला आलेली हिन वागणुक भारतातल्या समाजव्यवस्थेच्या मानसिकतेत आहे. पुरोहित वर्गाच्या स्वार्थी वृत्तीतून अन्यायाचा बळी ठरलेल्या अस्पृश्य समाजाला बाहेर काढण्यासाठी पहिली गोष्ट १) अस्पृश्य समाजात त्या विषयी जागृती करुन २) दुसरी गोस्ट अन्यायाच्या विरोधात प्रतिकार करण्यासाठी त्या समाजाला सज्ज करणे. अस्पृश्यांचा दबलेला आवाज बाहेर काढण्यासाठी त्यांची अस्मीता जागृत करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर केले.

**४. अस्पृश्य जातीचे संघटन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक सुधारणा करता असतांना समाज परिवर्तनाची चळवळ व्यापक करत असतांना अस्पृश्य जातीतील अनेक जातींचे संघटन करण्यावर भर दिला. अस्पृश्य समाजात जातीभेदामुळे वाढत असलेला अंतर्गत बेबनाव संपुष्ठात आणण्यासाठी अस्पृष्य जातीतील सर्वच उपजातीतील त्या-त्या जातीच्या नेत्याचे संघटन करुन त्यांना

कळकळीची विनंती /अव्हाण बाबासाहेब आंबेडकरांनी केले. अस्पृश्य जातीतील महार, मांग, चांभार यांनी एकत्र येण्यासाठी बाबासाहेबांनी खुप प्रयत्न केले. " शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा", असा गुरुमंत्र त्यांनी समाजाला दिला.

**५. बहुजनांसाठी शिक्षण**

भारतीय समाज व्यवस्थेत (वर्णव्यवस्थेत) एका विशिष्ट वर्गासाठी शिक्षण खुले होते. त्यामुळे साराच बहुजन समाज अज्ञान, अंधश्रध्दा, अनिष्ट रुढी, परंपरा, कर्मकांड यासारख्या अनेक गोष्टीने ग्रस्त होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला अनन्य साधारण महतत्त्व दिले. शिक्षणातून समाजाची नैतिक आणि सामाजिक उन्नती होते. सामाजिक दुःख निवारण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक सुशिक्षित असला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. समाजाची अधोगती अज्ञानामुळे आणि अहंकारामुळे होते. राजकीय चळवळी इतकेच महत्व बाबासाहेब शिक्षणाला देतात. त्यांच्या मते, शिक्षणाशिवाय मान्याच्या जागा काबिज करता येणार नाहीत.

समाजातील तळागळा पर्यंत शिक्षण पोहचण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९२८ मध्ये भारतीय बहिस्कृत समाज शिक्षण मंडाळाची स्थापणा केली. १४ जुन १९२८ मध्ये डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटीची स्थापणा केली. ८ जुलै १९४५ रोजी पिपल्स ऐज्युकेशन सोसायटीची स्थापणा केली आणि द बॉम्बे शेड्युल्ड कास्ट्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट या सारख्या शिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापणा करुन देशाच्या विविध भागात अनेक शिक्षण देणारे शाळा महाविद्यालये बहुजनांच्या शिक्षणांसाठी सुरु केले.

**६. महाड चवदार तळे सत्याग्रह (२०मार्च १९२७)**

संपूर्ण देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्याचा व पाणि पिण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळेच सर्व भारतीयांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी २० मार्च १९२७ मध्ये रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यांचा सत्याग्रह केला. आज २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो.

**७. हिंदू मंदिर सत्याग्रह**

हिंदू असून ही अस्पृश्यांना हिंदूच्या मंदिरात प्रवेश बंदी होती. हिंदू धर्म सर्व प्राणीमात्रावर दया करावी, सर्व मानव ईश्वराची लेकरे आहेत, अशी शिकवण देतो. परंतु अस्पृश्यांना हा हक्क नाकारला जात होता. त्यांना हा समानतेचा हक्क मिळवून देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अनेक मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह करावा लागला.

a. **काळाराम मंदिर सत्याग्रह ( २ मार्च १९३० )** - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह २ मार्च १९३० ला सुरू केला. सर्वांना समानतेचा हक्क मिळविण्यासाठी दिलेला हा लढा होता. हा लढा माणुकसकीस कलंक लावणाऱ्या अमानुष, अन्यायी व अघोरी अशा समाज व्यवस्थे विरुध्द होता. हा सत्याग्रह पाच वर्षे चालला.

b. **अंबादेवी मंदिर सत्याग्रह (२६ जुन १९२७)** - अमरावती येथील प्राचिन अंबादेवी मंदिरात अस्पृश्य समाजाला प्रवेश मिळावा यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पंजाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली २६ जुन १९२७ सत्याग्रह सुरू केला. या अगोदर ही अनेक वेळा अस्पृश्य समाजाने सत्याग्रह करुन मंदिर प्रवेशासाठी दोन वेळा देवस्थान कमिटीकडे अर्ज दिला होता. दोन्ही वेळी अस्पृश्यांचा अर्ज फेटाळला गेला. परंतु २६ जुन १९२७ च्या सत्याग्रहात मात्र देवस्थान विश्वस्त दादासाहेब खापर्डे यांनी अंबादेवीचे मंदिर खुले करुन देण्याचे आश्वासन बाबासाहेबांना दिले.

c. **पर्वती मंदिर सत्याग्रह पुणे (१३ ऑक्टोंबर १९२९)** - पुण्यातील पार्वती मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यासाठी १३ ऑक्टोंबर १९२९ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्यात आला. पुण्यातील पर्वती टेकडीवरील हे मंदिर सर्वणाती अस्पृश्यासाठी बंद केलेले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिर प्रवेशासाठी केलेले हे सत्याग्रह देवाच्या दर्शनासाठी नव्हते, पुण्य, मोक्ष मिळविण्यासाठी नव्हते. तर हिंदू असून ही हिंदूच्या मंदिरात प्रवेश मिळत नसल्यामुळे समानतेचा अधिकार मिळविण्यासाठी व अस्पृश्यांच्या प्रवेशामुळे मंदिर व मंदिरातील मुर्ती अपवित्र वा अशुध्द होत नाहीत. त्या विटाळत नाहीत हे सिध्द करण्यासाठी होता. माणसाला माणुसपण देण्यासाठी होता.

**८. बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापणा (२० जुलै १९२७)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापणा केली. सामाजिक व राजकिस दृष्ट्या तळागळात खितपत पडलेल्यां समाजातील लोकांना भारतीय समाजातील इतरांच्या बरोबर आणते, सर्वांना विकासाची व प्रगतीची समान संधी देणे हे या सभेचे ध्येय होते.

**९. शेतीचे राष्ट्रीयकरण संकल्पना**

शेतीला उद्योग मानून पायाभुत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. आर्थिक स्त्रोत तळागळातील गरीब शेतकरी व भुमीहिन शेतमजुर यांच्या पर्यंत पोहचले पाहिजेत म्हणजेच ग्रामिण माणसाच्या माणसिकतेत व आर्थिक परिस्थितीत बदल घडेल. आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. म्हणून त्यांनी शेतीचे राष्ट्रीयकरण करण्याची संकल्पना मांडली.

**१०. वंचित समुहाचे हित सवंर्धन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वंचित समुहाचे हित सर्वात महत्त्वाचे वाटत होते. त्यात खासकरुन कामगारांसाठी तर ते नेहमीच अधिक सक्रिय पुढाकार घेत. मुंबई विधिमंडळात ट्रेड डिस्प्युट बिलावर भाष्य करतांना ते म्हणतात, ज्या लोकशाहीत, जिवित्वाची साधने हाती नसलेल्या संघटनेच्या दृष्टीने विस्कळीत असलेल्या अशिक्षित व बुध्दीहिन कामगारांवर अशा तऱ्हेची गुलामगीरीची बंधने लादण्यात येतात. ती लोकशाहीच नव्हे, तर ते लोशाहीचे विडंबन आहे.



287

**११. स्त्रीयांचा उध्दार**

हिंदू समाज हा श्रेणीबध्द विषमतेच्या तत्वावर आधारलेला आहे. हिंदू समाजात स्त्रीयांना समता आणि न्याय नाकारलेला होता. चुल आणि मुल ऐवढेच स्त्रीचे कर्तव्य सांगितले होते. अज्ञान, अंधश्रध्दा, अनिष्ट रुढी, परंपरा, बालविवाह, कुमारी जरठ विाह, बहुपत्नी विवाह, देवदासी, सतीप्रथा, केशवपन यासारख्या असंख्य प्रथा व परंपरांनी भारतीय स्त्री बंदिस्त होती.

तीला या सर्व बंधनातून मुक्त करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. स्त्रीयांसाठी शिक्षण आणि सर्व क्षेत्रात तिच्यासाठी आरक्षणाची तरतुद घटनेत व कायद्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी करुन स्त्री सबलीकरणाचे धोरण राबविले.

**१२. हिंदू कोड बिलाची निर्मीती (२४ फेब्रुवारी १९४९)**

हिंदू कोड बिल हे भारतातील कायद्याचा मसुदा होता. हे बिल २४ फेब्रुवारी १९४९ मध्ये संसदेत मांडल्या गेले. स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना जाचक रुढी आणि अनिष्ठ परंपरापासून सुटका मिळावी यासाठी तयार केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ४ वर्ष १ महिना आणि २६ दिवस अभ्यास व सखोल लेखन करुन हे बिल तयार केले. देशातील सर्व जाती-धर्माच्या स्त्रीयांना समान अधिकार व संधी या बिलामुळे मिळणार होत्या. स्त्रियांच्या हक्क आणि अधिकाराविषयी अनेक बाबींचा समावेश या बिलात करण्यात आला होता. हे बिल संसदेत पास न झाल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २५ सप्टेंबर १९५१ ला आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिला.

**१३. जाती निर्मूलन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात जाती व्यवस्था ज्या धार्मिक श्रध्दांवर उभारलेली आहे. त्या श्रध्दा उध्दवस्त केल्या शिवाय जाती संस्था नष्ट होणे अशक्य आहे. हिंदू धर्म हा तत्व प्रधान नसून नियम प्रधान आहे. या जाती व्यवस्थेने अनेक जाचक बंधने अस्पृश्य समाजावर व सफल स्त्री समाजावर लादलेले आहेत. त्यामुळे देशाच्या व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाती निर्मूलनाची मोहिम हाती घेतलेली दिसून येते.

**१४. पुणे करार (२४ सप्टेंबर १९३२)**

दलितांना स्वतंत्र मतदार संघा ऐवजी सर्व प्रांतामध्ये सर्वसाधारण मतदार संघात लोकसंख्येच्या प्रमाणात जागा द्याव्यात हा पुणे कराराचा मुख्य मुद्दा होता. प्रांतिक विधान सभेत साधारण निवडणुक क्षेत्रातील जागापैकी दलित वर्गासाठी १४८ जागा राखीव ठेवण्यात येतील या अटिसह अनेक अटी अस्पृश्य उध्दारासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी पुणे करारात ठेवल्या होत्या. पुणे करार डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यात २४ सप्टेंबर १९३२ ला झाला.

**१५. मनुस्मृती दहन (२५ डिसेंबर १९२७)**

मनुस्मृतीमध्ये अस्पृश्य, शुद्र व स्त्रियां विषयी अन्यायकारक काही कायदे व श्लोक आहेत. या ग्रंथामुळे जातीव्यवस्था अस्पृश्यता, जातीबंधने जाचक बनली होती. या ग्रंथामुळे जातीव्यवस्था अस्पृश्यता, नातीबंधने जाचक बनली होती. या ग्रंथाला एक पवित्र धार्मिक ग्रंथ म्हणून अनेक स्वार्थी, लबाड, परंपरावादी व सनातनी लोक या ग्रंथाचे दाखले देवून समाजातील लोकांचे

शोषण करीत. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे २५ डिसेंबर १९२७ ला मनुस्मृती ग्रंथाचे जाहिर पणे दहन केले. आज २५ डिसेंबर हा दिवस देशात स्त्रीमुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो.

**१६. धम्मचक्र परिवर्तन (१४ ऑक्टोंबर १९५६ )**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर भारतीय समाज व्यवस्थेत सुधारणा करुन अस्पृश्य समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. प्रसंगी अर्ज, विनंत्या, धरणे, आंदोलने, सत्याग्रह केला. परंतु समाजाच्या माणसिकतेत बदल होत नाही. ते अस्पृश्य समाजातील लोकांना माणुस म्हणून बघण्यास तयार नाही. त्यांना हक्क आणि अधिकार देण्यास तयार नाहीत. याची जेव्हा त्यांना ठाम जाणिव झाली तेव्हा त्यांनी अगदी नाइलाजाने हिंदू धर्माचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे. ज्या धर्मात माणसाची माणुसकी ओळखणे अधर्म मानला जातो तो धर्म नसून रोग आहे. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक धर्मांचा अभ्यास करुन शेवटी नागपुर येथे १४ ऑक्टोंबर १९५६ ला आपल्या लाखो अनुयाया सह बौध्द धम्माची दिक्षा घेतली.

**१७. भारतीय राज्यघटनेची निर्मिती (२६ जानेवारी १९५०)**

भारतीय राज्यघटना हा भारताचा सर्वोच्च कायदा व पायाभूत कायदा आहे. संविधानातील तरतुदी नुसार राज्य कारभार करण्याचे शासनावर बंधन आहे. संविधानातील तरतुदी नुसार शासन चालविले जाते. संविधानाला विसंगत ठरतील असे कायदे शासनाला करता येत नाहीत. संविधानानुसार देशातील प्रत्येक नाकरीकाला समान मानले जाते. सर्वांना समान न्याय व समान हक्क दिले आहेत. एकंदरीत राज्य घटनेच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून भारतातील असंख्य जाती समुहात अनेक सामाजिक सुधारण केल्या असून, प्रत्येक समाजाला व व्यक्तीला स्वातंत्र्य, समता, बंधूभावा बरोबरच स्व विकासाची, सुधारणांची व प्रगतीची हमी दिलेली दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी लोकशाही शासन पध्दतीचा स्विकार केला. त्यासाठी एक मत एक मुल्य, आणि त्याची एकच किंमत हा सिध्दांत समाजाला दिला.

**संदर्भ ग्रंथ**

१. बोल महामानवाचे (खंड २) - अनुवाद आणि संपादक-डॉ.नरेंद्र जाधव.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ - संपादक मंडळ, नियंत्रक-दया पवार.

३. भारतीय संविधान - २००७.